




# लोकरंग






लोकसत्ता मुंबई-पुणे-नागपूर-अहमदनगर; रविवार, १९ मार्च १९९५

# आजच्या भारतात आगरकरांची भूमिका

**समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचे १९९५ हे स्मृति-शताब्दी वर्ष आहे. वैज्ञानिक दृष्टिकोनाची महती पटण्यापूर्वीच्या काळात आगरकरांनी बुद्धी प्रामाण्यवादाचा पुरस्कार केला आणि रूढी व अंधश्रद्धांमध्ये खितपत पडलेल्या समाजाला जागे करायचे निरंतर प्रयत्न केले. आगरकरांच्या स्मृति-शताब्दी वर्षानिमित्त आज पुण्यात 'आगरकरांचे विचार व आजची परिस्थिती' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला आहे. परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी जयंतराव टिळक असून उद्घाटक वसंत गोवारीकर आहेत. या निमित्ताने आजच्या भारतातील आगरकरांची भूमिका स्पष्ट करणारा हा लेख.**



● जयंत नारळीकर

'इष्ट असेल ते बोलणार आणि साध्य असेल ते करणार,' अशी ठाम भूमिका घेऊन समाज सुधारणेचे कार्य हाती घेणाऱ्या गोपाळ गणेश आगरकरांना जाऊन आज शंभर वर्षे झाली. त्याची आठवण ठेवून आगरकर स्मृति शताब्दी समितीने परिसंवादाचे आयोजन केले ते योग्यच आहे कारण आजच्या काळातही आगरकरांचे मार्गदर्शन आपल्याला हवे आहे.

'सुधारक'मधून रुढींविरुद्ध त्यांचे लेख, समाजाला बदलत्या काळानुसार नव्या मार्गाने जायची आवाहने बुद्धी प्रामाण्यवादाचा पुरस्कार इत्यादीमुळे आगरकर हे एक वादग्रस्त व्यक्तिमत्त्व झाले होते. विविध क्षेत्रातून प्रख्यात व्यक्तीकडून आणि कधी कधी पुराणमतवादी जनसामान्यांकडून विरोधात्मक प्रतिक्रिया येत राहिल्या तरी आगरकरांनी समाज सुधारणेचे कठोर व्रत चालू ठेवले.

पुनर्जन्म, चातुर्वर्ण्य, अस्पृश्यता, धर्मांधता, स्त्रियांना दिली जाणारी वागणूक, अंधश्रद्धा इत्यादीविरुद्ध आगरकरांची मोहीम सतत चालू होती. एकोणिसाव्या शतकात विज्ञान युगाचा उषःकाल झाला होता पण भारतीय समाज, तथाकथित सुशिक्षित वर्गही अजून मध्य युगातली साखरझोप अनुभवीत होता.

आगरकरांनी चर्चिलेले विषय आज कालबाह्य झाले आहेत का? केवळ भारताचे पारतंत्र्यातून स्वातंत्र्यात स्थित्यंतर एवढा विषय सोडला तर बाकी सर्व विषय आजही चिंता करण्याजोगे आहेत. भारताला स्वातंत्र्य मिळाले आणि स्वतःच्या प्रगतीची आखणी स्वतः करता आली तर समाजाला भेडसावणारे प्रश्न सुटतील, अशी एक अपेक्षा आगरकरांच्या जमान्यात व्यक्त करण्यात येत असे. परंतु स्वातंत्र्याचे अर्ध शतक पुरे होत आले तरी ते प्रश्न सुटले तर नाहीच पण अधिक जटिल झाल्याचे आपण पाहत आहोत. अशा काही प्रश्नांची या लेखात थोडक्यात चर्चा करण्यात आली आहे.

### धार्मिक असहिष्णुता

'धारयति इति धर्मः' अशी धर्माची व्यापक व्याख्या मला पटते. मनुष्य जंगली अवस्थेतून सुसंस्कृत समाजाचा घटक बनला तेव्हा त्याच्यापुढे दोन मुद्दे उपस्थित झाले. पहिला मुद्दा त्याच्या सामाजिक बांधिलकीचा. समाज व्यवस्था नीट टिकावी याकरिता घटक या नात्याने त्याची काही कर्तव्ये, आचारसंहिता असणार. धर्माकडून ते मार्गदर्शन अपेक्षित आहे. दुसरा मुद्दा त्याच्या व्यक्तिगत मनःशांतीचा, मानसिक विकासाचा, स्वतःच्यासाठी म्हणून त्याला धर्माकडून मार्गदर्शन हवे.

बहुतेक धर्मात हा मानवतावादी दृष्टिकोन सापडतो. विविध धर्मातल्या ज्येष्ठ प्रवर्तकांनी वेगवेगळ्या शब्दात हा विचार मांडलेला दिसतो पण कालांतराने प्रवर्तकांपासून अनुयायांपर्यंत जाता जाता धर्माची ही मूळ उद्दिष्टे बाजूला पडून त्याचा शक्तिप्रदर्शनाकरता वापर झालेला दिसतो. धार्मिक असहिष्णुता व मूलतत्ववाद बोकाळायला मग वेळ लागत नाही.

मी वर मांडलेल्या दोन मुद्यांपैकी दुसरा मनुष्याच्या श्रद्धेशी धर्माचा संबंध जोडतो. मनःशांतीसाठी मार्गदर्शक अशा श्रद्धा कुठल्याही मनुष्याने स्वतःसाठी बाळगायला हरकत नाही. परंतु समाजाचा घटक म्हणून त्यांची समाजाबद्दल जी कर्तव्ये आहेत त्याच्या आड या श्रद्धा येऊ नयेत. 'माझी श्रद्धास्थाने हीच दुसऱ्याची श्रद्धास्थाने असावीत,' असा अट्टाहास असता कामा नये. एका राष्ट्राचा नागरिक या नात्याने त्याने या श्रद्धास्थानांना राष्ट्राच्या आचारसंहितेपुढे दुय्यम स्थान दिले पाहिजे. त्याचप्रमाणे राष्ट्रीय आचारसंहिता आखताना वरील मर्यादा सांभाळून कुठल्याही नागरिकाला स्वतःची श्रद्धास्थाने बाळगण्याचे स्वातंत्र्य हवे. खरी धर्मनिरपेक्षता हीच असे मी म्हणेन.

दुर्दैवाने धर्मनिरपेक्षतेचा अर्थ 'राष्ट्राने प्रत्येक धर्माच्या दबावापुढे मान तुकविली पाहिजे,' असा लावला जातो. आणि तशीच स्थिती जातीभेदाची होत आहे. आगरकरांच्या काळी जातिभेद प्रखर होता. आज वेगळ्या स्वरूपात तो तितकाच प्रखर आहे आणि राजकीय भांडवल म्हणून त्याचा उपयोग केला जात आहे.

एका राजाच्या दरबारी एक गरीब शेतकरी मदत मागायला आला. राजाने तीन पंडितांना सल्ला विचारला. पहिला म्हणाला, त्याला पैशाची पिशवी द्या म्हणजे तो सुखाने परत जाईल. दुसरा म्हणाला, त्याला वेगळे उत्तम शेत द्या. तो ते नांगरून पैसे मिळवेल. तिसरा म्हणाला, त्याचे आहे ते शेत कसे सुधारावे, योग्य बी-बियाणे कुठली वगैरे माहिती त्याला पुरवा म्हणजे तो आपल्या पायावर उभा राहू शकेल. राजा म्हणाला, "पहिल्या पंडिताचा सल्ला मानला तर तो पुन्हा पैसे संपल्यावर आणखी मागायला येईल. दुसऱ्याचा सल्ला घेतला तर आयते मिळालेले खाण्याकडे त्या शेतकऱ्याची प्रवृत्ती होईल. तिसऱ्याचा सल्लाच शेतकऱ्याला आत्मसन्मानासह जीवितार्थ चालवायला मदत करेल." परंपरागत जातीयवादाने पोळलेल्यांबाबत आज पहिल्या आणि दुसऱ्या पंडितांचा सल्ला वापरला जातो. गरज आहे तिसऱ्या पंडिताच्या सल्ल्याची. नाही तर जातीभेद असेच टिकून राहतील.

'मुलगा हवा की मुलगी?' या प्रश्नाचे बहुसंख्य भारतीय 'मुलगा' असेच उत्तर देतील. परंतु बदलत्या परिस्थितीत पारंपरिक मूल्यांकडे पुन्हा पाहणे आवश्यक आहे आणि मुलगाच का हवा याची कारणे वैज्ञानिक दृष्टिकोनातून पाहायला हवीत: १) मुलगा वंशाचे नाव चालू ठेवतो: वंशाचे नाव मुलामुळे नव्हे तर स्वतःच्या कर्तबगारीमुळे टिकते. राणा प्रताप, शिवाजी महाराज, लोकमान्य टिळक, आगरकर, सी. व्ही. रामन, मेघनाद साहा, होमी भाभा वगैरे नावे त्यांच्या वारसामुळे टिकलेली नाहीत. २) मुलगा मिळवता असतो; हल्ली शिकलेल्या मुली पण मिळवतात आणि कौटुंबिक खर्चाला तोंड देतात. ३) मुलगा म्हातारपणची काठी असतो: पूर्वीच्या एकत्र कुटुंब पद्धतीत हे खरे होते. पण आता मुलगे लग्न झाल्यावर वेगळे राहणे पसंत करतात आणि लग्न झालेल्या मुली देखील वेळप्रसंगी आई-वडिलांच्या म्हातारपणी मदत करतात. ४) मुलाचे लग्न फायद्याचे तर मुलीचे तोट्याचे: हे हुंड्यामुळे! जसजसे शिक्षणाचे व समजूतदारपणाचे वारे समाजात वाहत जाईल तसतशी हुंड्याची अनिष्ट प्रथा कमी होत जाईल. पण यासाठी अजून पुष्कळ वाटचाल आवश्यक आहे.

आणि एकंदरीतच स्त्रियांना विविध क्षेत्रात मिळणारा दुय्यम दर्जा दूर करून त्यांना पुरुष समान अधिकार व जबाबदाऱ्या देण्यासाठी समाजाला पुष्कळ वाटचाल करायची आहे. याबाबतीत लोकशिक्षण, प्रसार माध्यम आणि समाजधुरीणांनी कृतीने केलेले मार्गदर्शन हे सर्व प्रभावी ठरेल.

### रूढी आणि अंधविश्वास

बदलत्या काळानुसार समाजाला आपल्या आचारसंहितेत बदल करणे जरुरी असते. विज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे पूर्वीच्या कित्येत समजुती गैरसमजुती ठरल्या आहेत. त्यांचा त्याग करणे वा त्यात आवश्यक ते बदल करणे समाजाचे कर्तव्य असते. परंतु अजूनही आपल्या समाजात एकविसावे शतक उजाडण्याऐवजी एकोणिसावे शतक ठाण धरून आहे. याची काही उदाहरणे पहा: १) सूर्यग्रहणाच्या वेळी मुंबईसारख्या प्रगत समजल्या जाणाऱ्या शहरात भर दिवसा रस्ते ओसाड पडतात. २) अनेक वैज्ञानिक चाचण्यांतून कुंडलीचा प्रत्यक्ष भविष्याशी काहीही संबंध दिसून आला नसला तरी विवाह, नव्या उपक्रमाची सुरुवात, प्रवासाला जाणे वगैरे बाबतीत फलज्योतिषाकडे धाव घेतली जाते. ३) स्वतः अभ्यास करून चांगले मार्क मिळवण्याचा प्रयत्न न करता देवाला नैवेद्याची लाच देऊन 'शॉर्टकट' वापरायचा मोह विद्यार्थ्यांना आवरत नाही. ४) चमत्कार आणि बुवाबाजीच्या मागे लागून पुष्कळ आयुष्ये बरबाद होतात. ५) महागाईच्या काळात आणि देशात रचनात्मक कार्याची पुष्कळ गरज असताना देखील होम हवन, मोठाली देवळे वा मशिदी बांधणे किंवा इतर कर्मकांडावर पाण्यासारखा पैसा ओतला जातो.

अशी उदाहरणे पुष्कळ सापडतील! वैज्ञानिक दृष्टिकोनाचा अभाव गरीब-श्रीमंत, सामान्य माणूस- नेतेमंडळी, अशिक्षित-वैज्ञानिक उपाध्या मिळवलेला सर्वांतच जाणवतो आणि हा अभाव विकसनशील राष्ट्राला परवडणारा नाही.

### यावर उपाय काय?

अशा परिस्थितीत सुधारणा होणे आवश्यक आहे पण ते प्रत्यक्षात व्हावे कसे?

१) प्रथम लोकशिक्षणाद्वारे सध्याच्या परिस्थितीत सुधारणेची गरज लोकांना पटवून दिली पाहिजे. त्याकरिता टी.व्ही.सारख्या प्रसारमाध्यमांचा भरपूर फायदा घेतला पाहिजे. २) चमत्कार बुवाबाजीचे खरे स्वरूप प्रात्यक्षिकाद्वारे उघड करावे. या कामी वैज्ञानिक व जादूगार मंडळी दोघांची मदत होऊ शकेल. ३) फलज्योतिषासारख्या अंधश्रद्धा वैज्ञानिक पुराव्यासह स्पष्ट कराव्यात. या कामी परदेशातील काही प्रयोग योग्य ते बदल करून भारतात करता येतील. ४) स्त्रियांना शिक्षण व उच्च शिक्षण दोन्हीत सवलती देऊन आणि त्या बरोबरच समाजाच्या विविध स्तरात योग्य ती माहिती देऊन स्त्रियांच्या बाबतीत न्याय्य वागणूक मिळवता येईल. ५) शाळांत लहान मुलांपासून सर्वांशी या प्रश्नांवर चर्चा करून त्यांना वैज्ञानिक दृष्टिकोनाने महत्त्व पटवणे जास्त सोपे ठरेल. कारण मोठ्या मंडळीप्रमाणे लहान मुले रुढी व अंधश्रद्धांच्या आहारी गेलेली नसतात. ६) आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे आगरकरांसारखी पुरोगामी विचारसरणी असलेली मंडळी समाजाचे नेतृत्व करायला आज हवी आहेत. ●